आर.सी.सी.क्र. ३१५/२०२२
शासन वि. शेख हफिजा वगैरे.
नि.क्र. ४१/क

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ फिर्यादी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

..........................................................................................................

| | | |
|---|---|---|
| **नांव** | **–** | **सानिया मैनोद्दिन शेख,** |
| **वय** | **–** | **२७ वर्षे,** |
| **धंदा** | **–** | **घरकाम,** |
| **राहणार** | **–** | **रा. कुरुगी गल्ली, मोन रोड, गेवराई. ता. गेवराई जि. बीड.** |

..........................................................................................................

**सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती. एस. ए. गायकवाड यांचेमार्फत सुरु –**

**१.** दि. ०२.०५.२०१९ रोजी आरोपी क्र.२ सोबत माझा विवाह झाला. आरोपी क्र.१ माझी सासु आहे. आरोपी क्र.३ माझे सासरे आहेत. आरोपी क्र.४ माझी नणंद आहे. आरोपी क्र.५ व ६ हे माझे दिर आहेत. लग्नानंतर मी माझ्या सासरी संजय नगर येथे नांदायला गेले होते. त्यानंतर काहीही घडले नाही. मी कोणत्याही कारणास्तव पोलीसांत गेले नव्हते. साक्षीदाराला फिर्यादी जबाबावरील तिची सही दाखविली. ती सही माझीच आहे. साक्षीदाराने तिची सही ओळखल्याने केवळ सहीला निशाणी ४३ देण्यात आली. माझा कोणाशीही वाद झाला नव्हता, मी कोणाविरुद्ध तक्रार दिली नव्हती.

**(सरकारी वकीलांनी साक्षीदार हा त्याचे पोलीसांसमोरील जबाबाचे विपरीत साक्ष देत असल्याने व सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याने साक्षीदाराची भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उलट तपासाची परवानगी मागितली. परवानगी दिली).**

२. आता मला दि. ०३/०६/२०२२ रोजीच्या फिर्यादी मधील अधोरेखित भाग पुर्ण वाचुन दाखविण्यात आला. त्यामध्ये काय नमुद केले प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ ते ६ आणि माइयात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपींविरुद्ध कोणतीही तक्रार उरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. मला या कामी इतर कोणताही साक्षीदार तपासावयाचा नाही.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी तर्फे उलट तपास वकील श्री एस. के. निकम यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.06.24 16:38:44 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. २४/०६/२०२५.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गेवराई**

**कोर्ट क्र.२**